# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : ey e3 /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : 27 JUN 2025

:: परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे **सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ३० जून, २०२५ रोजी पासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होत आहे**. सदर अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिका देण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(१) अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी मा.मंत्री महोदयांच्या कार्यालयातील खाजगी सचिव, प्रत्येकी १ विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक, चोपदार व २ शिपाई कर्मचाऱ्यांची नावे 'खाजगी सचिव' यांच्या स्वाक्षरीने **दिनांक २७ जून, २०२५ रोजी** पर्यंत या सचिवालयास कळवावीत.

(२) मंत्रालयीन विभागांनी विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी जास्तीत जास्त ३० अधिकाऱ्यांची व २० कर्मचाऱ्यांची नावे त्यांच्या विभागाच्या उप सचिव दर्जाचे अधिकारी यांचे स्वाक्षरीने **दिनांक २७ जून, २०२५ रोजी** पर्यंत या सचिवालयास कळवावीत. जेणेकरून प्रवेशपत्रिका वितरणापूर्वी प्रवेशपत्रिकेवर संबंधितांचे नाव, पदनाम, विभाग इ.माहिती लिहिणे सोईचे होईल. **विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

(३) सन २०२५ च्या विधानमंडळाच्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाकरिता देण्यात आलेल्या **प्रवेशपत्रिकांवर छायाचित्र व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा शिक्का असणे अनिवार्य राहील.**

(४) मा.मंत्री आस्थापना तसेच संबंधित मंत्रालयीन विभागाचे दिलेले स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असेल तरच विधानभवनात प्रवेश देण्यात येईल.

(५) अधिवेशन कालावधीत दैनंदिन प्रवेशपत्रिकांची मागणी मा.मंत्री महोदयांच्या स्वीय सहाय्यकांच्या स्वाक्षरीने न करता **खाजगी सचिवांच्या स्वाक्षरीने करावी.**

.. २/-

(६) अधिवेशन कालावधीत दैनंदिन प्रवेशपत्रिकांची मागणी कक्ष अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने न करता आपल्या **विभागाच्या उप सचिव दर्जाचे अधिकारी यांचे स्वाक्षरीने करावी. सदरील प्रवेशपत्रिका फक्त ग-१ कक्ष, सतरावा मजला, विधान भवन, मुंबई येथे उपलब्ध होतील.**

(७) अधिवेशन कालावधीत विधानमंडळ परिसर व अधिकारी गॅलरी येथे होणारी गर्दी लक्षात घेता अधिवेशनाच्या कामासंदर्भात दैनंदिन उपस्थित राहणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांकरिता वेळापत्रक तयार करुन प्रवेशपत्रिकांची मागणी करावी.

(८) मुंबई येथील (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२५ साठी घेतलेल्या प्रवेशपत्रिकांच्या दुरूपयोग होऊ नये यासाठी प्रत्येक विभागाने सदर प्रवेशपत्रिका न चुकता परत कराव्यात व त्यानंतर द्वितीय (पावसाळी) अधिवेशन, २०२५ साठीच्या अधिवेशनाच्या प्रवेशपत्रिकांची मागणी करावी.

वरील सुरक्षाविषयक सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

**(विजय कोमटवार)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

(१) मा.मुख्यमंत्री / मा.उप मुख्यमंत्री / मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

(२) सर्व मंत्रालयीन विभागांचे प्रधान सचिव/सचिव

याची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई